Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind
Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी,
आघारकर
रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 । EPABX -25705000 Fax : 25665807 । Secretary(P) : 25651750

जा. क्र.रा.मं./परीक्षा-७/3602-9
पुणे ४११ ००४.
दिनांक - २४/०६/२०२१

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्य.
शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे,

**विषय** :- सन २०२०-२१ या वर्षात परीक्षेसाठी इ.१०वी विद्यार्थ्यांना शासकीय रेखाकला परीक्षेचे सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबत.

**संदर्भ** :-
१)शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०२/एसडी२ दि.२४/११/२०१७ व दि.२०/१२/२०१७ चे शासन शुध्दीपत्र
२)उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.एडीआर-२०२१/प्र.क्र.१५/तांशि ६ दि.२६/०३/२०२१
३)शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.०५२१/प्र.क्र.४३/एसडी-२ दि.२८/०५/२०२१
४)उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासन निर्णय क्र.एडीआर-२०२१/प्र.क्र.१५/तां.शि.६, दि.१६/०६/२०२१
५)शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचे क्रमांक संकीर्ण०६२१/प्र.क्र.१२/एसडी-२, दि.२३.०६.२०२१

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णय पत्र क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२०२/एसडी२ दि.२४/११/२०१७ नुसार शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारामध्ये सहभाग होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यात येतात.

तथापि याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.एडीआर २०२१/प्र.क्र.१५/तां.शि.६,दि.२६/०३/२०२१ नुसार राज्यातील कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे, विद्यार्थ्यांचे आरोग्य व सुरक्षिततेची बाब लक्षात घेवून शासकीय रेखाकला परीक्षा २०२० चे आयोजन करण्यात येवू नये व सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना शासकीय रेखाकला परीक्षेचे सवलतीचे अतिरिक्त गुण देण्यात येवू नये असे नमूद केले होते.

तद्नंतर शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दि.२८/०५/२०२१ च्या शासन निर्णयान्वये जाहीर केलेल्या इ.१०वी मूल्यमापन कार्यपध्दतीमध्ये सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी शासनाच्या व मंडळाच्या धोरणानुसार व तरतुदीनुसार देय असलेल्या अन्य गुणांचा लाभ प्रचलित पध्दतीनुसार देण्यास मान्यता देण्यात दिलेली आहे.

तसच याप्रकरणी पुन:श्च उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.एडीआर-२०२१/प्र.क्र.१५/तां.शि.६, दि.१६/६/२०२१ अन्वये कोविड-१९ या संसर्गजन्य साथ रोगाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना शासकीय रेखाकला परीक्षेचे सवलतीचे अतिरिक्त गुण देता यावेत यासाठी दि.२६/०३/२०२१ चा शासन निर्णय अधिक्रमित (रद्द) करुन, तरतूंद क्र. ०३ व ०५ नुसार, खालील प्रमाणे सवलतीचे गुणदान देण्यात यावे असे सूचित केले आहे.

१) यापूर्वी एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा दि.२४ नोव्हेंबर, २०१७ चा शासन निर्णय आणि दि.२० डिसेंबर, २०१७ चे शासन शुध्दीपत्र यामधील तरतुदीनुसार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेमध्ये अतिरिक्त गुणांची सवलत देता येईल.

२) सन २०२०-२१ या वर्षी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस बसलेल्या ज्या विद्यार्थ्यांनी एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षा उत्तीर्ण केली आहे, तथापि कोविड-१९ च्या परिस्थितीमध्ये त्यांना इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेस बसता न आल्याने ते परीक्षा उत्तीर्ण होवू शकले नाहीत अशा विद्यार्थ्यांना एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षेस मिळालेली श्रेणी इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेकरिता प्रदान करण्यात यावी. या श्रेणीच्या आधारे केवळ शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ मध्ये इ.१० वी परीक्षेमध्ये अतिरिक्त गुणांची सवलत देण्यात यावी. असे नमूद केले आहे.

तसेच उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणेबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई यांच्या दि.२३ जून २०२१ रोजीच्या पत्रानुसार आदेशीत केले आहे. या बाबी विचारात घेवून याबाबतचे प्रस्ताव स्विकारण्यासाठी अंतिम मुदतवाढ खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| तपशिल | दिनांक |
|---|---|
| विद्यार्थ्यांनी शाळेकडे विहित नमुन्यात प्रस्ताव सादर करणे | शुक्रवार, दि.२५.०६.२०२१ ते<br>बुधवार, दि. ३०.०६.२०२१ |
| शाळांनी विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करणे | सोमवार, दि.२८.०६.२०२१ ते<br>शुक्रवार, दि.०२.०७.२०२१ |

तरी संदर्भिय क्र.१ मधील शासन निर्णयात नमूद केल्यानुसार सन २०२०-२१ या वर्षात परीक्षेसाठी इ.१०वी विद्यार्थ्यांना शासकीय रेखाकला परीक्षेचे सवलतीचे अतिरिक्त गुण देणेबाबत उचित कार्यवाही करावी. व कोणताही विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी. व सदरची बाब सर्व माध्यमिक शाळा, मुख्याध्यापक, शिक्षक, सर्व विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.

**क्र. कोविमं/शाखा-१० वी परीक्षा/446 कोल्हापूर - ४१६ ००४ दिनांक - २४/०६ /२०२१**

**प्रति,**

**मुख्याध्यापक,**

**सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा (सातारा /सांगली /कोल्हापूर)**

**उपरोक्त पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, शासकीय रेखाकला परीक्षेचे सवलतीचे वाढीव गुणाचे प्रस्ताव या कार्यालयास दिनांक २८/०६/२०२१ ते दिनांक ०२/०७/२०२१ या कालवधीत सादर करण्यात यावेत. मुदतीनंतर प्रस्ताव स्विकारले जाणार नाही व विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस हे कार्यालय जाबाबदार रहाणार नाही याची नोंद घ्यावी.**

**(देविदास कुलाळ)**
**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर**